# रशिया – यूक्रेन संघर्षाचे जागतिक परिणाम आणि भारताची भूमिका

**श्री. प्रशांत सोमनाथ प्रक्षाळे** सहायक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग छत्रपती शिवाजी कॉलेज,सातारा

Mob no: ९०११५३७२९५

---

**सारांश:**

जागतिक राजकारण आणि परराष्ट्र धोरणाची निर्मिती राष्ट्रीय हिताला अनुसरून होत असते. ज्यामध्ये संघर्ष हा अटळ असतो असे वास्तववादी विचार हॅन्स मोर्गेंथो यांनी आपल्या पॉलिटिक्स अमंग नेशन या ग्रंथात प्रतिपादित केले असून संघर्ष ही बाब अपरिहार्य ठरवली आहे. परंतु जागतिक राजकारणात एखाद्या राष्ट्राचे राष्ट्रीय हित हे आत्यंतिक राष्ट्रवादावर स्वार झाले की मानवतावादावर आणि जागतिक शांततेवर संकट निर्माण होते हेच24 फेब्रुवारी 2022 पासून सुरू झालेल्या रशिया-युक्रेन युद्धा मधील ब्लादीमिर पुतीन यांच्या भूमिकेवरून स्पष्ट होते.तर युक्रेन चे राष्ट्रपति झेलन्स्की यांच्या अव्यावहारी आणि अपरिपक्व नेतृत्वाने नाटो राष्ट्रांवर विसंबून राहून रशियाला आव्हान देणे किती विध्वंसक असू शकते याचे जीवंत उदाहरण म्हणजे रशिया कडून मानवी वस्तीवर हल्ले करून बुचा, कीव, खेरसॉन, सुमी,खारकीव, मारीयुपोल ही शहरे उध्वस्त केली आहेत.

सदर रशिया युक्रेन युद्धाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, तत्कालिक कारणे, भारताची या संघर्षात असणारी भूमिका भारतावर आणि वैश्विक पातळीवर होणारे दूरगामी परिणाम याचा सदर संशोधन लेखात आढावा घेण्यात आला आहे .

**मुख्य शब्द:**

राष्ट्र-राज्य, शीतयुद्ध , संघर्ष, रशिया, युक्रेन, आत्यंतिक राष्ट्रवाद, बफरझोन, नो फ्लाय झोन, परराष्ट्र धोरण, राष्ट्रहित, आंतरराष्ट्रीय राजकारण, मानवाधिकार.


**प्रस्तावना:**

प्राचीन ग्रीक नगर राज्यातील आणि प्राचीन भारतातील नगर राज्यावर आधारित असणारी नगरराज्य रचनेचे रूपांतर १७ व्या शतकात १६४८ च्या वेस्टफालिया तहाने बदलून जागतिक विश्वपुर्रचनेचा पाया घातला गेला. यूरोपियन राष्ट्रांची साम्राज्यशाहीची आकांक्षा जसजशा धारदार होत गेल्या तस-तसे राष्ट्र –राज्य व्यवस्थेला खतपाणी मिळत गेले आणि नवीन जागतिक विश्व रचनेत यूरोपियन राष्ट्रांनी बघता बघता संपूर्ण जगावर आर्थिक आणि राजकीय स्वरूपाची मक्तेदारी निर्माण केली. यातून संपूर्ण जगावर अधिराज्य निर्माण करण्याची चढाओढ युरोपिय राष्ट्रांमध्ये सुरू झाली. त्यातून एकोणीसाव्या शतकाच्या शेवटी युरोपात शस्त्र निर्मितीची चढाओढ निर्माण झाली तर दुसऱ्या बाजूला आत्यंतिक राष्ट्रवादाला खतपाणी घालणारे व्यक्तिमत्व उदयाला आली. त्यामुळे युरोपला एक प्रकारे युद्धभूमीचे स्वरूप प्राप्त झाले होते. त्यातून पहिल्या महायुद्धाची आग उसळली. ही आग जवळ जवळ पाच वर्षानी 1918 मध्ये शांत झाली आणि विजेत्या राष्ट्रांनी जर्मनी वर व्हर्सायचा तह लादून जर्मनीचे लचके तोडण्याचा प्रयत्न केला.त्या प्रकारामधून जर्मनी मध्ये हिटरल चा तर इटली मध्ये बेनोटो मुसोलिणीचा उदय झाला आणि दुसऱ्या महायुद्धाला सुरुवात झाली. हे युद्ध अति विध्वंसक स्तरावर समाप्त झाले, जपानच्या हिरोशिमा आणि नागासकी या दोन शहरावर अणुबॉम्ब टाकून टाकण्यात आले होते. दुसरे महायुद्ध समाप्त झाले परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर 1917 मध्ये अस्तीत्वात आलेला सोव्हियट रशिया आणि अमेरिका यांच्यात शीतयुद्ध सुरू आले. खर तर ही दोन्ही राष्ट्रे दुसऱ्या महायुद्धातील एकाच गटातील होती परंतु अमेरिकेने निर्माण केलेली अण्वस्त्र यापासून रशियाला अंधारात ठेवण्यात आले त्यामुळे रशिया आणि अमेरिका संघर्ष निर्माण झाला. या संघर्षाला जागतिक राजकरणात 'शीतयुद्ध' असे संबोधले जाते. हे शीतयुद्ध अमेरिकेच्या नेतृत्वाखाली 4 एप्रिल 1949 रोजी नाटो या लष्करी संघटनेची तर सोव्हियट रशियाने वॉरसा गटाची निर्मिती केली. या शीतयुद्धात अनेक अशी संघर्ष केंद्रे निर्माण झाली. उदा: उत्तर कोरिया-दक्षिण कोरिया, उत्तर व्हियतनाम-दक्षिण व्हियतनाम, पूर्व जर्मनी –पश्चिम जर्मनी, इस्राइल- पॅलेस्टीन, इराक-कुवेत, अरब- इस्राइल. इराण-इराक, भारत-पाकिस्तान, सायप्रस प्रश्न, क्युबा संकट. अशा अनेक संघर्षाची मालिका महासत्तांच्या आपापसातील संघर्षामधून तयार झाली. मात्र 1980 च्या दशकानंतर जागतिक राजकारणातील सोव्हियट संघाच्या अस्तित्वाला तडे गेले. सोव्हियट संघ स्वतंत्र पंधरा राष्ट्रामध्ये विभागाला. आणि शीतयुद्धाचा शेवट झाला. तत्कालीन अमेरिकन राष्ट्रपती जॉर्ज बुश (सीनियर) यांनी पाच कलमी योजना माडून एक ध्रुवीय जगाची संकल्पना मांडली. त्यामुळे शीतयुद्धात निर्माण झालेले काही संघर्ष मिटले , जसे की, जर्मनी चे एकीकरण, व्हीयतनाम चे एकीकरण . परंतु सोव्हियट रशियाच्या विघटनाणे रशिया समोर अनेक प्रश्न निर्माण झाले. ढासळलेली अर्थव्यवस्था आणि आण्विक शस्त्रांचे संरक्षण आणि जागतिक राजकारणातील रशियाची प्रतिष्ठा पुन्हा प्राप्त करणे अशा अनेक समस्यांनी ग्रासलेल्या रशियाला

2001 मध्ये ब्लादीमिर पुतीन यांचे नेतृत्व लाभले. त्यांनी रशियाचे गत वैभव प्राप्त करून पूर्वीचा सोव्हियट संघ निर्माण करण्याची विस्तारवादी भूमीका स्वीकारलेली दिसून येते. त्या भूमिकेतुनच २००८ मध्ये जॉर्जिया वर हल्ला केला होता.२०१४ मध्ये क्रिमिया मध्ये आपले लष्करी तळ उभारून यूक्रेन च्या सार्वभौमत्वाला आव्हान देण्याचा प्रयत्न चालवला तेव्हा पासून रशिया- युक्रेन संघर्षाला सुरुवात झाल्याचे दिसून येते.

**रशिया युक्रेन संघर्षाची पार्श्वभूमी:**

१९९१ मध्ये सोव्हियट संघाचे पतन झाल्यानंतर पंधरा नवीन स्वतंत्र गणराज्ये निर्माण झाली त्यापैकी सर्वात मोठे गणराज्य हे युक्रेन होते. १९९१ नंतर अनेक वर्षे रशिया आणि युक्रेन यांच्यामध्ये घनिष्ट संबंध कायम राहिले. अनेक विषयावर सहमतीने मार्ग काढण्याचे धोरण अवलंबले होते. विशेषतः युक्रेन मध्ये असणारी आण्विक शस्त्रागरे डिसेंबर १९९४ मध्ये युक्रेनने बुडापेस्ट मेमोरँडम ऑन सिक्युरिटी अॅश्युरन्स या करारान्वये रशियाला सुपूर्द करण्याची तयारी दर्शवली आणि ती रशियाला हस्तांतरित करताना आपल्या प्रादेशिक अखंडतेची आणि राजकीय स्वातंत्र्याची हमी रशिया कडून देण्यात आली. ब्लॅक सी सी फ्लीटचे विभाजन युक्रेन ने मान्य केले. युक्रेनने सेवास्तोपोलसह अनेक नौदल सुविधा भाड्याने देण्याचे मान्य केले जेणेकरून रशियन ब्लॅक सी फ्लीट युक्रेनच्या नौदल सैन्यासह तेथे कार्यरत राहू शकेल.परंतु हे संबंध फार काळ टिकू शकले नाहीत. २००१ मध्ये युक्रेन ने जॉर्जिया, अझरबैजान आणि मोल्दोव्हा यांच्यासमवेत ऑर्गनायझेशन फॉर डेमोक्रसी अँड इकॉनॉमिक डेव्हलपमेंट नावाचा एक गट स्थापन केला ज्याला रशियाने एक आपल्याला दिलेले आव्हान समजले. याच दरम्यान २००४ मध्ये युक्रेन मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत रशिया समर्थक उमेदवार व्हिक्टर यानुकोविच ऐवजी युरोप समर्थक व्हिक्टर युश्चेन्को अध्यक्ष म्हणून निवडून आले. व्हिक्टर युश्चेन्को यांनी नाटो राष्ट्रांबरोबर जवळीक वाढवायला सुरुवात केली. त्याचाच एक भाग म्हणून अमेरिकेने इराक वर केलेल्या हल्ल्याचे फक्त समर्थन केले नाही तर आपल्या सैन्याची तुकडी तैनात केली. अफगाणिस्तान ,कोसोओ या देशातील नाटो पुरस्कृत लष्करी कारवाईचे समर्थन करून नाटो गटाबरोबर आपली जवळीक युक्रेन वाढवत राहिला. सप्टेंबर 2013 मध्ये, रशियाने इशारा दिला की जर युक्रेनने युरोपियन युनियनसोबत नियोजित मुक्त व्यापार करार केला तर त्याला आर्थिक आपत्ती आणि कदाचित राज्याच्या नाशाचा सामना करावा लागेल. राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांचे सल्लागार सर्गेई ग्लाझीव्ह म्हणाले, "युक्रेनियन अधिकारी जर त्यांना वाटत असेल की आतापासून काही वर्षांत रशियन प्रतिक्रिया तटस्थ होईल. असे होणार नाही." रशियाने आधीच काही युक्रेनियन उत्पादनांवर आयात निर्बंध लादले आहेत आणि जर करारावर स्वाक्षरी झाली तर ग्लाझीव्हने पुढील निर्बंध नाकारले नाहीत. युक्रेनच्या पूर्व आणि दक्षिणेस रशियन भाषिक भागात फुटीरतावादी चळवळी वाढवण्याची धमकी ग्लाझीव्ह यांनी दिली होती. जर युक्रेनने करारावर स्वाक्षरी केली तर ते रशियाबरोबरच्या धोरणात्मक भागीदारी आणि मैत्रीच्या द्विपक्षीय कराराचे उल्लंघन असेल त्यामुळे रशिया युक्रेन ला एक राज्य म्हणून पाहणार नाही अशीही धमकी दिली. २०१४ मध्ये युक्रेनचा भूभाग असलेल्या क्रिमिया आपले लष्करी तळ उभा केले. तिथून खऱ्या अर्थाने रशिया युक्रेन युद्धाची कहाणी तयार झालेली दिसून येते.याच क्रिमिया मधील सर्वात मोठे शहर सेवेस्तोपोल या ठिकाणी नाविक तळाचे मुख्यालय स्थापन स्थापन केले आहे.



शीत युद्धाच्या समाप्ती नंतर वॉरसा संघटन रशियाने विसर्जित केले परंतु अमेरिका पुरस्कृत नाटो संघटना विसर्जित झाली नाही उलट सोव्हियट संघाच्या पतनानंतर हे संघटन आणखी मजबूत झालेचे **वरील नकाशावरून** स्पष्ट होते. ही रशियाच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे. १९९७ नंतर रशिया भोवती नाटोचा फास घट्ट होताना दिसून येतो आहे. बेलारुस आणि युक्रेन ही दोन राष्ट्रे सोडली तर जवळजवळ चौदा राष्ट्रांनी नाटोचे सुरक्षा कवच प्राप्त करून रशियन सुरक्षा यंत्रणेला आव्हान निर्माण केले आहे. अशा संकटप्रसंगी युक्रेनचे राष्ट्रपति ब्लादीमिर झेलन्स्की यांनी नाटो मध्ये युक्रेनला सहभागी करून घेण्याच्या हालचाली तीव्र केल्या. त्यामुळे रशियन सीमेवर नाटो लष्करी तळ निर्माण होण्याची तार्किक भीती रशियन राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतीन यांना वाटत होती म्हणून २४ फेब्रुवारी २०२२ रोजी युक्रेन वर अतिशय विध्वंसक स्वरूपाचा हल्ला केला. या हल्ल्यानंतर वास्तविक पाहता अमेरिका आणि नाटो यांनी या युद्धात प्रत्यक्ष युक्रेनची मदत करणे अपेक्षित होते परंतु पुतीन यांचा आक्रमक पवित्रा पाहून नाटो राष्ट्रे रशियावर आर्थिक निर्बंध लादण्यापलीकडे काही करू करू शकत नाहीत. झेलेंस्की यांनी युक्रेन चा प्रदेश नो फ्लाय झोन घोषित करावा असे नाटोला वारंवार आवाहन केले. परंतु पुतीन यांच्या युद्धखोर पवित्र्याने नाटो राष्ट्रांना बेदखल करून युक्रेन मधील बुचा, कीव, खेरसॉन, सुमी,खारकीव, मारीयुपोल ही शहरे उध्वस्त केली आहेत. या युद्धामधून **युक्रेनला निशस्त्र करून** रशियन संरक्षणाच्या दृस्तीने **युक्रेनच्या पूर्वेकडील डोनबास प्रांताला युक्रेन पासून तोडून क्रिमिया पासून डोणबास पर्यंत एक कॉरिडोर बनवणे, युक्रेन ला काळ्या समुद्रापासून पुर्णपणे तोडून टाकणे युक्रेनला नाटो मध्ये प्रवेश करण्यापासून रोखणे** या प्रमुख उद्देशाने आणि १९९० पूर्वीचा सोव्हियट संघ निर्माण करण्याच्या महत्वकांक्षी धोरणातून पुतीन यांनी हल्ला केल्याचे दिसून येते. वास्तविक पाहता युक्रेनी राष्ट्रपती झेलन्स्की यांनी नाटो गटात प्रवेश करण्याची जिद्द सोडून देऊन युक्रेन हे एक बफर झोन निर्माण करणे अपेक्षित होते परंतु असे झाले नाही.

**जागतिक परिणाम:**

१. दुसऱ्या महायुद्धापर्यन्तआणि शीत युद्धात ही युद्धभूमीचे स्वरूप प्राप्त झालेल्या युरोप खंड १९९१ नंतर आर्थिक आघाड्यावर प्रगति करण्यात गुंतला होता. मात्र या युद्धाने **युरोप खंडाला पुन्हा एकदा एका व्यापक युद्धाच्या दिशेने घेऊन जाण्याची तयारी** केलेली दिसून येते म्हणून या युद्धाचे दूरगामी परिणाम हे एकट्या रशिया किंवा युक्रेन पुरते मर्यादित राहणार नाहीत.

२. एका बाजूला तैवानला गिळंकृत करून आणि साऊथ चीन समुद्रावर एकाधिकारशाही निर्माण करून चीन आपली विस्तारवादी नीतीने जागतिक दहशत निर्माण करत असतानाच रशिया पुतीन यांच्या नेतृत्वाखाली पूर्वीचा सोव्हियट संघाची विस्तारवादी नीती बाळगून आहे आणि त्याला उत्तर कोरियाचा हुकूमशहा किम जोंग यांची साथ अशी एक जागतिक शांततेला भंग करणारी **रशिया-चीन- उत्तर कोरिया-पाकिस्तान अशी आघाडी** निर्माण होऊ पाहत आहे. की जी जागतिक मानवतावादावर संकट निर्माण करू शकते.

३. १९४९ मध्ये अस्तीत्वात आलेल्या नाटो संघटनेचा सातत्यपूर्ण विस्तार होत राहिला. विशेषतः १९९७ नंतर सोव्हियट संघाचा भाग असणारी आणि इतर काही अशी १४ राष्ट्रे नाटोची सदस्य बनली. (पहा नकाशा नं.१) त्या अर्थाने नाटो हे एक मजबूत लष्करी संघटन होते. मात्र या रशिया- युक्रेन युद्धात ब्लदिमीर पुतीन यांच्या आक्रमक युद्ध कौशल्याने नाटोला प्रत्यक्ष युद्धात भाग घेण्यापासून रोखलेच नाही तर नाटो राष्ट्रांना धमकावले तरी नाटो राष्ट्रे आणि अमेरिका प्रत्यक्ष युद्धात सहभागी झाले नाहीत या अर्थाने **नाटोचे अध:पतन** झाले असे दिसून येते.

४. **आत्यंतिक राष्ट्रवादातून जागतिक शांतता भंग होण्याची भीती** जशी दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वी व्यक्त केली जात होती त्याच पद्धतीने रशिया-युक्रेन युद्धाने पर्यायाने ब्लादीमिर पुतीन यांच्या आत्यंतिक राष्ट्रवादाने जागतिक शांतता भंग केली आहे. त्याला साथ देण्याचे काम चीन,उत्तर कोरिया आणि पाकिस्तान सारखी राष्ट्रे करत आहेत याचे दूरगामी परिणाम आंतरराष्ट्रीय शांततमय सहजीवनावर होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

५. एकेकाळी सोव्हियट संघाच्या विरोधात गनिमी पद्धतीने युद्ध करणारे **चेचन्या प्रांतातील चेचन्या बंडखोर** रशिया-युक्रेन युद्धात युक्रेनच्या पूर्व भागात रशियन लष्कराच्या मदतीला प्रत्यक्ष युद्धात उतरले आहेत ही रशियाच्या दृस्तीने जमेची बाजू ठरली आहे.

६. आर्थिक निर्बंधाचे जागतिक राजकारण नव्याने आकार घेत असून अमेरिकेसह युरोपातील बहुतांश राष्ट्रांनी रशियावर आर्थिक निर्बंध लागू केले असून रशियाची आर्थिक कोंडी करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. अनेक युरोपीय राष्ट्रांनी रशियन दूतावास बंद करून रशियन राजनायिक अधिकाऱ्यांना आपल्या देशातून बाहेर काढले आहे यामध्ये प्रामुख्याने इटली, अमेरिका, स्वीडन, डेन्मार्क, स्पेन, एस्टोनिया, इंग्लंड,फ्रांस, जपान या राष्ट्रांचा समावेश आहे.

७. जागतिक शेअर बाजाराला फटका बसला आहे. अमेरिकेसह युरोपातील बहुतांश राष्ट्रांनी रशियावर आर्थिक निर्बंध लागू केले असल्याने बहुराष्ट्रीय कंपन्याच्या शेअर बाजाराला बसला आहे. विशेषता बँकिंग क्षेत्राला याची फार मोठी झळ बसली आहे.

८. रशिया जगातील सुमारे ८० देशांना कच्च्या तेलाची निर्यात करतो आहे या देशात **कच्च्या तेलाचे भाव वाढण्याची शक्यता आहे**

९. शस्त्रास्त्र स्पर्धा वाढण्याची भीती निर्माण झाली आहे. विशेषता **आण्विक शस्त्रे आणि लांब पल्ल्याची मारा करणारी घातक क्षेपणास्त्रे निर्माण करण्याची मोहीम** पाश्चमात्य राष्ट्रात पुन्हा नव्याने सुरू होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याची सुरुवातही झाली आहे. अमेरिका, ब्रिटन आणिऑस्ट्रोलिया यांनी नुकत्याच स्थापन केलेल्या **'ऑकस'** या सुरक्षा आघाडी अंतर्गत हिंद आणि प्रशांत महासागरातील चीनच्या वाढत्या प्रभावाला पायबंद घालण्यासाठी **हायपरसॉनिक मिसाईल** विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे .

१०. संयुक्त राष्ट्राच्या मानवाधिकार परिषदेपुढे मांडलेल्या युक्रेन मधील मानवाधिकाराचे रशियाकडून झालेल्या उल्लंघांनामुळे या परिषदेपुढे रशिया विरोधात आलेल्या प्रस्तावावर ९३ देशांनी रशिया विरोधात, २४ राष्ट्रांनी रशियाच्या बाजूने तर ५८ राष्ट्रांनी तटस्थ भुमिका स्वीकारली आणि बहुमताने **रशियाला युनो च्या मानवाधिकार परिषदेतून निष्कासित करण्यात आले** आहे. (दि.०७/०४/२०२२ चा ठराव) याचे गंभीर परिणाम भविष्यातील जागतिक राजकरणावर आणि युनोच्या कामकाज प्रक्रियेवरहोण्याची शक्यता नाकारता येत नाही कारण रशिया हा सुरक्षा परिषदेच्या स्थायी सदस्यापैकी एक आहे.

११. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या सैद्धांतिक विकासात ज्यांनी मोलाचे योगदान दिले ते हॅन्स मोर्गेन्थौ यांनी जागतिक राजकारणाचा वास्तववादी सिद्धांत मांडताना राष्ट्रीय हिताचा आधार हा राष्ट्राची सामरिक शक्ति हीच असू शकते.कारण जागतिक राजकरणात संघर्ष हा अपरिहार्य असून नैतिक अनैतिक बाबींना राष्ट्रीय हिताच्या कक्षेत स्थान असत नाही. ह्या **हॅन्स मोर्गेन्थौ यांच्या सैद्धांतिक विचारला २१ व्या शतकात नव्याने बल मिळाले आहे**.

१२. रशियाने ज्या क्रूर मानसिकतेने युक्रेन बेचिराख केला आहे त्याच्याकडे पहिले तर पंडित नेहरू यांनी जागतिक शांततामय सहजीवनासाठी मांडलेली **पंचशील तत्वे आणि अलिप्तराष्ट्र गटांची चळवळ** आज ही किती गरजेची आहे तिची **प्रासंगिकता** जगासमोर आली आहे.

**भारताची भूमिका:**

२४ फेब्रुवारी २०२२ रोजी युक्रेन मधील भारताच्या दूतावासाने एक पत्रक काढून भारतीय नागरिकांनी तात्काळ प्रभावने युक्रेन सोडून मायदेशी परतावे असे आवाहन केले. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शांततेने उभय राष्ट्रांनी समस्येवर तोडगा काढला जावा असे आवाहन केले. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी दि. ६एप्रिल २०२२ रोजी भारताच्या संसदेत निवेदन करताना बुचा शहरातील नरसंहारवर चिंता व्यक्त करून भारत अशा कोणत्याही हिंसाचाराचे समर्थन करणार नाही असे स्पष्ट केले.आणि अशा घटनांची स्वतंत्र चौकशीची मागणी केली( The Indian Express-Date: 07/04/2022) तर एका बाजूला पाश्च्यामात्ये राष्ट्रे युरोपवर आर्थिक निर्बंध लादत असताना भारताने रशियाकडून कच्चे तेल खरेदी करण्याची तयारीही दर्शवली आहे. त्यामुळे विशेषता अमेरिका आणि इतर युरोपिय राष्ट्रांचा रोष भारतावर येण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारताने या युद्धात आपल्या सामरिक हिताला लक्षात घेता युरोपिय राष्ट्रांबरोबर दुहेरी भूमिका स्वीकारलेली दिसते. कारण भारताची रशिया बरोबरची असणारी सामरिक भागीदारी महत्वपूर्ण आहे. त्यामुळे सदर युद्धात भारताने आपली भूमिका तटस्थ ठेवली असल्याचे दिसून येते. भारताच्या युक्रेन मुदध्यावर युनोच्या सुरक्षा समितीत आलेल्या ठरावावर भारताने मतदानादरम्यान तटस्थ भूमिका स्वीकारली. सरकारच्या या भूमिकेला विरोधी पक्षाने ही एकमुखाने पाठींबा दिला.(दै. सकाळ.४ मार्च २०२२ पान नं८) भारताच्या दौऱ्यावर आलेले रशियन परराष्ट्रमंत्री लाव्हरोव्ह यांनी भारताच्या तटस्थ भूमिकचे समर्थन करून भारत-रशिया संबंधावर कोणताही परिणाम होणार नाही असे जाहीर केले.या दोन दिवशीय दौऱ्यात त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्याची चर्चा करताना प्रामुख्याने द्विपक्षीय सहकार्य, युक्रेन,अफगाणिस्तान, इराण,प्रशांत महासागर क्षेत्र,आशियान आणि भारतीय उपखंडातील घडामोडी केंद्रस्थानी होत्या (दै. सकाळ.२ एप्रिल २०२२ P.1) संयुक्त राष्ट्राच्या मानवाधिकार परिषदेमधून रशियाला निष्काशित करणाऱ्या ठरवावर ही भारताने मतदानात भाग न घेता तटस्थ भूमिका स्वीकारली. या ठरावाने रशियाला मानवाधिकार परिषदेतून निष्काशित केले. या मतदान प्रक्रियेत ९३ देशांनी रशियाच्या विरोधात तर २४ देशांनी रशियाच्या बाजूने तर भारतासहित ५८ देशांनी तटस्थ भूमिका स्वीकारली. एका बाजूला नैसर्गिक मित्र रशिया आणि दुसऱ्या बाजूला नव्याने मित्र झालेला अमेरिका या उभय

राष्ट्रांबरोबर जवळचे संबंध ठेवूनच पाकिस्तान आणि चीन या राष्ट्रांचा मुकाबला करणे शक्य आहे. अशी भारतीय नेतृत्वाची भूमिका तयार झाली आहे. म्हणूनच इस्राइल पॅलेस्टीन संघर्षात इस्राइल च्या विरोधात युनोच्या मानवाधिकार परिषदेत भारताने तटस्थ भूमिका स्वीकारली आहे. ही तटस्थ भूमिका ही भारताच्या मूल्य परंपरेची सुसंगत नाही अशीही टिप्पणी केली जाते. कारण रशियाने कोणत्याही सार्वभौम राष्ट्रावर हल्ला करून तिथे विध्वंस करावा आणि भारताने त्याचा अजिबात निषेध ही करू नये, हे भारताच्या आंतरराष्ट्रीय भूमिकेला अजिबात साजेसे नाही. ज्या पद्धतीने भारतासाठी रशिया महत्वाचा आहे तितकेच किंवा त्याहून अधिक पाश्चमात्य देश हे भुराजकीय व समारीक दृस्तीने महत्वाचे आहेत. याचे ही भान भारतीय नेतृत्वाला असावे. कारण पाश्चमात्य देश भारताकडे एक लोकशाहीप्रधान,जबाबदार, आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन करणारे राष्ट्र म्हणून पाहतात त्यामुळे रशियाच्या हल्ल्याबाबत भारताची प्रतिक्रिया महत्वाची आहे आणि ती आज ना उद्या भारताला ती मांडावीच लागेल असे मत डॉ. समीर पाटील आणि निहार कुलकर्णी आणि व्यक्त केले आहे (दैनिक सकाळ दि.४ मार्च २०२२ संपादकीय आर्टिकल,"रशियाबाबत भारताची सत्वपरीक्षा"P.7)

**भारतावर होणारे/झालेले परिणाम:**

१.युक्रेन मध्ये वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या सुमारे १८००० भारतीय नागरिकांना रुमानिया, पोलंड, हंगेरी , मालडोवा, स्लोव्हाकिया या देशातून रेस्कु करण्यात आले. यासाठी भारताने ऑपरेशन गंगा मोहीम राबवली. यामध्ये बहुतांश वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि त्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम झाला आहे. युद्धाच्या सहाव्या दिवशी वैद्यकीय शिक्षण घेणारा कर्नाटक मधील रहिवासी नवीन एस. जी. ह्या विद्यार्थ्याचा रशियन हल्ल्यात मृत्यू झाल्याची घटना घडली. युक्रेन मधून परत आलेल्या भारतीय मुलांच्या अर्धवट वैद्यकीय शिक्षणाचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

२.रशिया युक्रेन मधील युद्धाचा परिणाम जसा जागतिक शेअर मार्केट वर झाला तसा तो भारतावर ही झाल्याचे दिसून येते. युद्ध सुरू झाल्याच्या पाहिल्याच दिवशी शेअर बाजार सुरू झाल्यावर लगेच शेअर बाजार 2000 अंकांनी घसरला आणि तो 55683 अंकावर पोहचला होता.

३.भारताला आवश्यक असणारे 80% कच्चे तेल भारत आयात करतो आहे.तर 65% खाद्य तेल आयात करतो आहे त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती या गतवर्षी पेक्षा वाढल्या आहेत हा व्यवहार डॉलर मध्ये होत असल्याने रुपयाचे अवमूल्यन होते आहे. त्याच्या अतिरिक्त ताण भारतीय अर्थव्यवस्थेवर पडणार आहे.

४.रशिया हा एक आघाडीचा व्यापारी भागीदार देश आहे. एप्रिल 2020 ते मार्च 2021 पर्यंत उभय देशाची एकूण व्यापारी भागीदारी 8.1 बिलियन अमेरिकन डॉलर इतकी राहिली होती त्यामध्ये भारताची रशियाकडून होणारी आयात 5.8 बिलियन डॉलर तर भारताची

निर्यात2.6 बिलियन डॉलर होती.( https://www.indianembassy-moscow.gov.in/overview.php) तर युक्रेन भारत द्विपक्षीय व्यापार सन २०१८-२०१९ मध्ये २.८ बिलियन डॉलर राहिला आहे. (Source: Department of Commerce, Ministry of Commerce & Industry) 2018 पर्यन्त भारत आणि अमेरिका 142.1 बिलियन आमेरिकन डॉलर पर्यन्त या उभय राष्ट्रांमध्ये व्यापार वृद्धी झालेली दिसून येते . या सर्व व्यापारी भागीदारीवर भविष्यात फार मोठा प्रभाव पडण्याची शक्यता आहे.

५.भारताच्या संरक्षण सज्जतेवर परिणाम 2016 नंतर भारतची अमेरिकेबरोबरची संरक्षण भागीदारी सर्वाधिक स्वरूपाची आहे म्हणूनच भारताने अमेरिकेला संरक्षण आणि सामारिक सहभागीदारचा दर्जा प्रधान केला आहे. तर रशिया बरोबरही भारताची संरक्षण भागीदारी मोठ्या प्रमाणात विकसित झाली आहे. रशियाकडून एस. 400 क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली खरेदी केली असल्याने अमेरिका भारतावर नाराज आहे तर अमेरिकेबरोबरची संरक्षण भागीदारी वाढवल्यामुळे रशियाने आपला मोर्चा चीन पाकिस्तान कडे वळविला आहे . त्यामुळेच रशियाने चीनला सुखोई 35, एस-400 मिसाईल सारखी अत्याधुनिक हत्याराचा पुरवठा रशियाकडून झालेला आहे. पाकिस्तानलाही Mi-35 हेलिकॉप्टर आणि JF-17Thunder विमानाची इंजिन यांचा पुरवठा शिवाय संयुक्त युद्ध अभ्यास तसेच चीनच्या वन रोड वन बेल्ट या प्रकल्पाला भारताने विरोध केलेला असला तरी रशियाने त्याचे समर्थन केले आहे. त्यामुळे या रशिया-युक्रेन युद्धाच्या निमित्तानेही भारताच्या संरक्षण सिद्धतेवर परिणाम होण्याची शक्यता आहे.कारण युक्रेन मधील विमान उत्पादक अँटोनोव्ह आणि झोरया माशप्रोयक्ट यासह संरक्षणाशी संबंधित आस्थापणावर रशियाने हल्ले चढवले आहेत त्यामुळे भारताची चिंता वाढली आहे. कारण ही ही कंपनी भारतीय संरक्षण साहित्याचा पुरवठा करणारी प्रमुख कंपनी आहे.भारतीय हवाई दलाच्या वाहतुकीच्या विमानपैकी 100 विमाने ही अँटोनोव्ह बनावटीची आहेत तर भारतीय नौदलातील जहाजवरील सुमारे 30 टर्बाइन ही झोरया माशप्रोयक्ट बनावटीची आहेत त्यामुळे भारताच्या संरक्षण सिद्धतेवर परिणाम होईल.

६.रुपयात घसरण झाल्याने सोने चांदीच्या भावात वाढ झाली आहे. या युद्धाच्या सुरुवातीलाच सोन्याचा भाव प्रती तोळा 53 हजारावर,तर चांदी 65 हजारावर पोहचली. रुपयाचे सातत्याने अवमूल्यन होत आहे.

७. या युद्धाने भारतातील अन्नधान्य तसेच दैनंदिन वापरतील वस्तूंचा पुरवठा विस्कळीतहोण्याची शक्यता सुरुवातीपासून तयार झाली होती कारण युक्रेनला अन्नधान्याचे कोठार मानले जाते. युक्रेन मधून अन्नधान्य आणि खाद्यतेलाचा पुरवठा होतो त्यामुळे हा पुरवठा प्रभावित होऊन महागाई वाढली आहे.

**समारोप:**

रशिया –युक्रेन युद्धाने पुन्हा एकदा आत्यंतिक राष्ट्रवादाचा क्रूर चेहरा जगासमोर आलेला दिसून येते. या युद्धाने शीत युद्ध 2 ची सुरुवात झाल्याचे स्पष्ट झाले असून जागतिक शांततेसाठी किती घातक ठरेल याची कल्पना आताच करणे हे घाईचे असले तरी ही परिस्थिति फक्त पुतीन यांच्या विस्तारवादी धोरणाची फलनिष्पत्ती आहे असे नाही तर अमेरिकेचे रशियन संरक्षण सिद्धतेला नाटोच्या माध्यमातून आव्हान देण्याचा वारंवार केलेला प्रयत्न आणि झेलन्स्की नाटो मध्ये जाण्याची जिद्द या सर्वांचा परिपाक म्हणजे युक्रेन मधील नरसंहार होय. 1997 पासून नाटोचा विस्तार हा रशिया भोवती वेगाने होताना राष्ट्रीय सुरक्षेच्या दृस्तीने पुतीनची युद्धखोर प्रवृतीचे समर्थन करण्याला जागा असली तरी कोणत्याही प्रकारच्या अमानवीय युद्धखोर प्रवृतीचा निषेधच केला पाहिजे कारण या युद्धाने जागतिक स्तरावर विपरीत परिणाम घडून आणले आहेत. रामचंद्र गुहा आपल्या साधना मधील लेखात म्हणतात की,ज्या ज्या वेळी महासत्तांनी दुर्बल राष्ट्रांवर आक्रमणे केली आहेत त्या त्या वेळी त्या देशाला आपली प्रतिष्टा गमवावी लागलेली आहे अफगाणिस्तान मध्ये रशियाची जी अवस्था झाली तीच अवस्था युक्रेन मध्ये होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे ते पुढे म्हणतात की , ब्लाडिमिर पुतीन कोण्या रशियन इतिहास काराचे ऐकत असेल तर, अफगाण पराभवानंतर रशियाच मनोबल खच्ची झालं आणि त्या नंतरच्या काळात रशियन साम्राजाची सत्ता आणि प्रभाव ओसरत गेला विसरता कामा नये. या युद्धाचा प्रसंगी भारताची भूमिकाही राष्ट्रीय हिताच्या दृस्तीने योग्य असली तरी ती नैतिकेच्या कसोटीवर योग्य नाही हेच सिद्ध होते. याचे उत्तर आज ना उद्या भारतीय नेतृत्वाला द्यावेच लागेल. कारण रशियाने केलेल्या नरसंहारचा साधा निषेध ही न करणे हे वर्तमान भारतीय परराष्ट्र धोरणाचे विकलांग पण आहे असेच म्हणावे लागेल.

**संदर्भ:**

१. वसंत रायपूरकर- आंतरराष्ट्रीय संबंध

२. डॉ. शैलेन्द्र देळाणकर – भारतीय परराष्ट्र धोरण- सातत्य आणि स्थित्यंतरे

३. डॉ. शैलेन्द्र देळाणकर आंतरराष्ट्रीय संबंध

४. रामचंद्र गुहा – साधना मासिक ,०५ मार्च २०२२- घातक भ्रम: चार सैनिकी दृष्कृत्याविषयी

५. बीबीसी वेबसाइट वरील नाटो विस्तार नकाशा

६. डॉ. समीर पाटील, निहाल कुलकर्णी संपादकीय लेख – रशिया बाबत भारताची सत्वपरीक्षा- दै. सकाळ दि.४मार्च २०२२ आणि पान नंबर ८

७. दैनिक प्रभात –दि. २९ मार्च २०२२ पान नंबर १

८. ओंकार माने- महाराष्ट्र टाइम्स –तटस्थ भारताची कसोटी- दि ८ एप्रिल २०२२

९. दै. सकाळ.२ एप्रिल २०२२ P.1

१०. दि.०७/०४/२०२२ चा यूएनओ ठराव

११. Indian Express – Date: 7 April 2022, Page No. 1

१२. https://www.dw.com/en/ukraine-crisis-how-successful-were-indias-repatriation-efforts/a-61099021#:~:text=India%20has%20completed%20the%20final,The%20operation%20ended%20on%20Thursday.

१३. https://www.indianembassy-moscow.gov.in/overview.php

१४. Wikipedia

१५. Department of Commerce, Ministry of Commerce & Industry